| | | |
|---|---|---|
| | **पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण**<br>पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक – पिन 422003<br>दुरध्वनी नंबर 0253-2309700<br>E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

**प्रेस नोट** दिनांक : ३१/०७/२०२४

## नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे फिर्यादींना मुद्देमाल प्रदान कार्यक्रमाचे आयोजन

---

आज दि. ३१/०७/२०२४ रोजी पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांचे संकल्पनेतुन नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे गुन्हयांमधील फिर्यादींना मुद्देमाल प्रदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

ग्रामीण पोलीस दलातर्फे जिल्हयातील पोलीस ठाणे निहाय दाखल असलेल्या गुन्हयांमध्ये हस्तगत केलेला किंमती मुद्देमाल तक्रारदारांना प्रदान करण्याचा कार्यक्रम पोलीस अधीक्षक कार्यालय, आडगाव येथे पार पडला. मालाविरुध्दचे गुन्हयांमध्ये चोरीस गेलेले सोने-चांदीचे दागिने, वाहने, मोबाईल फोन, रोख रक्कम तसेच इतर मुद्देमाल मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे संबंधीत तक्रारदारांना प्रदान करण्यात येतो. नाशिक ग्रामीण जिल्हयातील पोलीस ठाण्यांनिहाय दाखल असलेले मालाविरुध्दचे गुन्हयांमधील उघडकीस आलेले गुन्हयांमध्ये हस्तगत करण्यात आलेला सुमारे **३१ लाख ३६ हजार ९९६ रुपये** किंमतीचा विविध मद्देमाल संबंधीत तक्रारदारांना वाटप करण्यात आला. प्रदान केलेल्या मुद्देमालात सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम, मोबाईल फोन व मोटर सायकल असा मुद्देमाल यावेळी उपस्थितांना वाटप करण्यात आला, यामुळे नागरीकांमध्ये समाधानाचे वातावरण होते.

सदर कार्यक्रमा प्रसंगी पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांचे मार्गदर्शनानुसार अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांचेसह पोलीस ठाण्यांचे मुद्देमाल कारकुन उपस्थित होते. यावेळी उपस्थित नागरीकांनी बाहेरगावी जातांना विशेष काळजी घ्यावी, किंमती दागिने, पैसे बॅंकेत ठेवावेत, बाहेर जातांना शेजा-यांना कल्पना दयावी, शक्य असल्यास सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसवावेत, तसेच मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन योग्य ती खबरदारी घेवुन पोलीस दलास सहकार्य करावे असे आवाहन उपस्थित नागरीकांना करण्यात आले.